# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
शैक्षणिक विभाग, मान्यता कक्ष

## परिपत्रक क्र. ९३/२०२२

विषय : संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांच्या कॅस अंतर्गत निवड समितीने शिफारस केलेले प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत...

विद्यापीठ अनुदान आयोग दि. १८ जुलै, २०१८ रोजीची अधिसूचना व महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ आणि शासन शुध्दीपत्रक दि. १० मे, २०१९ मधील तरतुदीनुसार संबंधित संलग्नित महाविद्यालयांमधील अध्यापकांची कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती करण्यात येते. त्यानंतर संबंधित महाविद्यालयांमध्ये अध्यापकांची कॅस अंतर्गत पदोन्नती देण्याबाबत निवड समिती गठित करून कॅस अंतर्गत पदोन्नती देण्याबाबत अध्यापकांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात येते.

कॅस अंतर्गत अध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदी पदोन्नतीसाठी निवड समितीने शिफारस केलेली आहे, अशा पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नतीचा लाभ देण्यास विलंब होऊ नये तसेच विद्यापीठ मान्यतेची प्रत अध्यापकांना त्वरित मिळावी ही बाब लक्षात घेता, सर्व संबंधित महाविद्यालयांनी पात्र अध्यापकांच्या पदोन्नतीसाठी निवड समितीने शिफारस केलेल्या अध्यापकांची पदोन्नती संदर्भातील पुढील कार्यवाही सुकर होण्यासाठी त्या संबंधीचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयाच्या Login मधून सादर करावेत व त्याची एक प्रत अनुषंगिक सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सादर करावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जा. क्र. सीसीओ/१४०५
दि. ०२ मे, २०२२

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**
मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक